
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | बुधवार, 8 एप्रिल 2026 | अंक क्र. 319 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# आपण कोणाला दोष द्यायचा नाही आणि कोणाचा द्वेष करायचा नाही, नियती सगळे काही नीट करते : धनंजय मुंडे

## भगवानगडाची ऐश्वर्यसंपन्नता महंत डॉ. नामदेव शास्त्रींनी अबाधित राखली : मुंडेंचे बडेवाडी येथील नारळी सप्ताहात विधान

■ पाथर्डी (प्रतिनिधी)

कोणी आपल्याला दोष देवो किंवा आपलं द्वेष करो, आपण मात्र कोणाला दोष द्यायचा नाही किंवा कुणाचा द्वेष करायचा नाही नियती सर्वांचा हिशोब नीट करत असते असे वक्तव्य माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्यावतीने पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे आयोजित अखंड नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात धनंजय मुंडे बोलत होते. भक्ती, शक्ती आणि विश्वासाची भगवानगडाची परंपरा आहे. लाखो ऊसतोड कामगार आपल्या एक रुपया कमाईतील वीस पैसे देणगी भगवानगडाला देतात आणि त्यातूनच या गडाची महती आज देश विदेशात पोहोचली आहे. ऐश्वर्य संपन्न संत भगवान बाबांनी भगवान गडाची गादी ही ऐश्वर्य संपन्न बनवली ऐश्वर्य संपन्नतेची ती परंपरा आभारीत राखण्याचे काम आज गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव शास्त्री यांच्यामार्फत केले जात असल्याचे विधानही यावेळी धनंजय मुंडे यांनी केले.

भगवानगड हे आपले ऊर्जा स्थान असून भगवानगडाच्या सावलीत आपल्याला नेहमी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी व्यासपीठावर महंत डॉ. नामदेव शास्त्री, गडाचे उत्तराधिकारी ह. भ. प. कृष्णा महाराज शास्त्री, आईसाहेब संस्थानच्या ह. भ. प. राधाताई सानप, खा. निलेश लंके, आ. मोनिकाताई राजळे, माजी आ. बाळासाहेब आजबे, ॲड. प्रताप ढाकणे, ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांसह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आधी बडेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी धनंजय मुंडे यांची जंगी मिरवणूक काढत फुलांची उधळण करत जोरदार स्वागत केले.

उमापूर येथे नारायणगडाच्या सप्ताहासही दिली भेट, महंत शिवाजी महाराजांचे घेतले आशीर्वाद दरम्यान बडेवाडी येथे जाण्याअगोदर धनंजय मुंडे यांनी गेवराई तालुक्यातील उमापूर येथे श्री क्षेत्र नारायणगडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थिती लावली. यावेळी गडाचे महंत ह. भ. प. शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी ग्रामस्थानी धनंजय मुंडे यांचे स्वागत केले, यावेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हेही उपस्थित होते.










# परळी येथे माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांचा गवळी समाजाकडून भव्य व उत्स्फूर्त सत्कार

## ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिरात श्रीं चे घेतले सहकुटूंबासह घेतले दर्शन

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज आहीर हे आपल्या कुटुंबियांसह परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग भगवान वैद्यनाथ मंदिरात दर्शनासाठी आले असता, महाराष्ट्र गवळी समाज संघटनेच्या वतीने त्यांचा अत्यंत उत्साहात व भव्य स्वरूपात सत्कार करण्यात आला. या भेटीमुळे परळी शहरात तसेच गवळी समाजात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मंदिर परिसरात आगमन होताच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मा. आहीर यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी घोषणाबाजी करत वातावरण भारावून टाकले होते. आहीर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या नेतृत्वाखाली समाजाला नवी दिशा मिळत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

या सत्कार प्रसंगी संघटनेचे राज्य सहसचिव जगन्नाथ साळुंके, जिल्हाध्यक्ष मुन्ना बागवाले, शहराध्यक्ष तथा नगर परिषद सदस्य नितीन बागवाले, तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व गवळी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने आहीर यांच्या कार्याचे कौतुक केले.

यानंतर मा. आहीर यांनी स्थानिक पदाधिकारी संतोष साळुंके यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी समाजातील प्रमुख पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. समाजासमोरील विविध समस्या, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीचे प्रश्न, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. तसेच संघटनेच्या माध्यमातून समाज एकत्र आणून विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. आपल्या मनोगतात मा. आहीर यांनी गवळी समाज हा परंपरेने कष्टकरी व प्रामाणिक असून, योग्य मार्गदर्शन व संघटित प्रयत्नांच्या जोरावर समाज अधिक प्रगती करू शकतो, असे सांगितले. केंद्र सरकार व विविध आयोगांच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. समाजातील युवकांनी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा, व्यवसाय आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा स्वीकार करून स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमामुळे गवळी समाजात नवचैतन्य निर्माण झाले असून, उपस्थितांनी मा. आहीर यांच्या मार्गदर्शनामुळे समाजाच्या प्रगतीला नवी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. भविष्यातही असेच सहकार्य व मार्गदर्शन मिळावे, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले व समाज एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.





# परळी तहसीलच्या 'त्या' मंडळ अधिकाऱ्याचा मनमानी कारभार

## बदली करुन चौकशी करण्याची मागणी; राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलच्या तालुकाध्यक्षांचे थेट चंद्रकांत बावनकुळे यांना पत्र

■ परळी वैजनाथ ( नितीन ढाकणे )

परळी तहसील कार्यालयांतर्गत कार्यरत असलेले मंडळ अधिकारी रंगनाथ बाजीराव कुमटकर (सज्जा नागपूर) यांच्या गैरकारभाराविरुद्ध आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) आक्रमक झाली आहे. कुमटकर यांच्या कार्यपद्धतीमुळे सर्वसामान्य जनतेची कामे खोळंबली असून, त्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांची तत्काळ मराठवाड्याबाहेर बदली करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याच्या महसूलमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

### नेमकं प्रकरण काय ?

हनुमंत उत्तमराव फड (तालुकाध्यक्ष, ओबीसी सेल) यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या पत्रात खळबळजनक आरोप केले आहेत. मंडळ अधिकारी कुमटकर हे त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी किंवा कार्यालयात कधीच वेळेवर उपलब्ध नसतात. जेव्हा नागरिक आपल्या कामासाठी जातात, तेव्हा अधिकारी गायब असल्याचे चित्र वारंवार पाहायला मिळते. यामुळे शासकीय योजना आणि महत्त्वाची कागदपत्रे मिळवण्यासाठी सर्वसामान्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

कुमटकर हे राजकीय दबावाखाली येऊन चुकीची आणि खोटी कामे करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. असेही त्यांनी आपल्या पत्रामध्ये नमूद केले आहे जनसामान्यांची कामे वेळेत न केल्यामुळे लोकांमध्ये प्रचंड संताप आहे.

### १५ दिवसांचा अल्टिमेटम !

■ "जर या अर्जाची दखल घेऊन संबंधित निष्क्रीय अधिकाऱ्यावर १५ दिवसांत कठोर कार्यवाही झाली नाही, तर परळी तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा हनुमंत फड यांनी प्रशासनाला दिला आहे. या निवेदनाच्या प्रती बीडचे जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि परळीच्या तहसीलदारांनाही माहितीसाठी व कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. आता प्रशासन या अधिकाऱ्यावर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.




### कामाच्या वेळा अनिश्चित

■ संबंधित अधिकारी नेमके कुठे असतात आणि त्यांच्या कामकाजाची वेळ काय, याचा कोणताही पत्ता नसतो. असेही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

# संपादकीय

## अवकाळी पावसाचा तडाखा; शेतकरी पुन्हा संकटात!

**हवामान बदलाचे परिणाम यापूर्वीच तज्ज्ञांनी वारंवार सांगितले होते. मात्र, सरकार, प्रशासन आणि समाज या सर्वांनी त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. आज त्याचे दुष्परिणाम शेतकऱ्यांना भोगावे लागत आहेत. केवळ नुकसान भरपाई देण्यावर भर देण्याऐवजी मूळ कारणांवर उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**आंब्यासह अंगूर, टरबूज, खरबूज आदी पिलांचे उत्पादन बऱ्यापैकी झाले होते. फळांना सुरू झालेल्या रमजानमुळे बऱ्यापैकी मागणी होती आणि या मागणीमुळे बाजारात चांगल्या प्रकारचा भाव ही मिळत होता. इतकंच काय पण नेहमीप्रमाणे एखादी देशात द्राक्षांची मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू झाली. सुरुवातीला आखाती देशात युद्ध सुरू झाले, अनेक बंदरात निर्यात होणाऱ्या द्राक्षांनी कंटेनर भरून जहाज प्रस्थान करायला तयार होती पण युद्धामुळे निर्यात टप्प झाली. त्यानंतर देशांतर्गत भाव बऱ्यापैकी उतरले. तरी सुद्धा निर्यात झाल्यास बऱ्यापैकी पैसे मिळतील अशी आशा होती पण मध्येच एकाएकी कुठेतरी कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला.**

**एल निनो चे संकट येणार याची चर्चा सुरू होती, त्यापूर्वीच वादळ आणि गारपीट पाऊस सुरू झाला. मर्यादित भागापुरता, मर्यादित जिल्ह्यात बरं असणाऱ्या गारपिटीने आपले पाय पुसले कुठे कांदा, कुठे कांद्याचे बी, उभी अशी गेली काही पिके काढून ठेवलेली पिके आणि मुख्य म्हणजे झाडावरील आंबे, द्राक्ष यांचं मोठेच नुकसान झाले. आंब्याबाबत तर विशेषतः कोकणातील हापूस बद्दल तर देवाने शेतकऱ्यांना अक्षरशः रडवले आहे. मुळातच गेल्या वर्षी काय पडत राहिलेल्या पावसामुळे आणि बदललेल्या हवामानामुळे पीक विषम म्हणजे काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी भरघोस उत्पादन मिळण्याची शक्यता होती तर काही ठिकाणी कमी प्रमाणात उत्पादन होण्याची भीती होती. गारपीट आणि पावसामुळे फार मोठे नुकसान या भागातील शेतकऱ्यांना विशेषतः आंबा उत्पादकांना सहन करावे लागत आहे.**

**आपल्याकडे कुठलेही नुकसान झाले कारण कोणतेही असो तातडीने नेत्यांचे पीक उगवते आणि पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाई द्या अशी मागणी केली जाते. नुकसान आहे की नाही झाले की नाही याची खात्री न करता पंचनामे नको सरसकट नुकसान भरपाई द्या अशी मागणी केली जाते या पुढाऱ्यांच्या मागणीला दहा पटीने प्रतिसाद ही मोठ्या प्रमाणावर मिळतो. आणि नुकसान शेतकऱ्यांचे झाले म्हणजे एक मोठ्या संख्येत असलेला मतदार वर्ग दुखावला जाऊ नये म्हणून सरकार त्या दृष्टीने मदत जाहीर करते. पुन्हा पुढारी आम्हाला मिळालं नाही मदत वाटतात भेदभाव केला अशा तऱ्हेचे खरे खोटे दावे करू लागतात असे वर्षानुवर्षे सुरू आहे.**

**हवामान बदलामुळे असे होणार याची इशारा गावचे अनेक वर्षे तज्ज्ञ म्हणून घेणारे देत होते. या इशाऱ्याकडे सोयीस्करपणे सरकार शेतकरी आणि प्रशासन म्हणून जी माणसं खऱ्या अर्थाने सत्ता राबवतात या सर्वांनी तज्ज्ञांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले त्याचे हे दुष्परिणाम आता सगळेजण भोगत आहेत. इतकंच या गारपीटी बद्दल आपल्याला सांगता येईल बाकी एक वेळ नक्की असेल की या नुकसान भरपाई देण्यासाठी सरकार जवळ दमडी ही उरणार नाही असं आमचं मत आहे कारण दुष्काळ्याचं मूळ शोधून त्यावर उपाय करण्याऐवजी नुकसान भरपाई सारखे लोकांना म्हणजे मतदारांना खुश करणारे मलमपट्टी सारखे उपाय केले तर दुसरे काय होणार?**



# लोकमानस

## मुलखावेगळी माणस ३ वर्षांचा छोटा पिकासो

प्रतिभेला वयाची मर्यादा नसते. हे सिद्ध करून दाखवले आहे उत्तर प्रदेशमधील मेरठ येथे राहणाऱ्या ३ वर्षे वयाच्या विराज सक्सेना या मुलाने. छोटासा विराज असे काही चित्र तयार करतो की पाहणाऱ्याला आश्चर्य वाटते. या प्रतिभेमुळे विराजचे नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसह अनेक प्रतिष्ठित रेकॉर्ड बुकमध्ये त्याचे नाव नोंदवण्यात आले आहे. लोक आता विराजला ' छोटा पिकासो या नावाने ओळखतात.

नवनीत सक्सेना हे नौचंदी ठाणे क्षेत्रात येणाऱ्या सम्राट पॅलेस येथे राहतात. ते नोएडातील एका खासगी कंपनीत मॅनेजर आहेत. त्यांची पत्नी प्रियंका आणि ३ वर्षांचा मुलगा विराज असे त्यांचे कुटुंब आहे. विराज शास्त्रीनगरात असलेल्या अमेरिकन किड्स स्कूलच्या नर्सरीचा विद्यार्थी आहे. करोनामुळे सर्व शाळा बंद आहेत. यामुळे विराजने हातात पेंटिंगचा ब्रश आणि ड्रॉइंग पेपर घेतला. त्यानंतर आत लपलेली त्याची प्रतिभा विकसित झाली.

विराजने आपले पहिले पेंटिग तो २ वर्षे ७ महिन्यांचा असताना तयार केली, अशी माहिती त्याच्या आईने दिली. त्यानंतर तो हातात ब्रश घेऊन कॅनव्हॉसवर काही ना काही साकारतच राहिला. त्यानंतर विराजने एक अतिशय उत्तम पेंटिंग तयार केली. या पेंटिंगला विश्वकर्मा आर्ट इंटरनॅशनल, दिल्लीने पुरस्कार दिला. हा विराजला मिळालेला पहिला पुरस्कार होता. त्यावेळी विराजचे वय २ वर्षे १० महिने इतके होते, अशी माहिती त्याची आई प्रियंका यांनी दिली.यानंतर विराजच्या नावाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली. तेथे त्याला 'व्हर्सटाइल पेंटर'चा किताब मिळाला. त्यानंतर त्याचे नाव इंडनय बुक रेकॉर्ड आणि एशिया बुक रेकॉर्डमध्ये पोहोचले. तेथे त्याला यंगेस्ट 'व्हर्सटाइल आर्टिस्ट' आणि 'ग्रँड मास्टर' या उपाधी मिळाल्या. विराजची कलाम वर्ल्ड रेकॉर्डसाठीही निवड झाली. यासाठी २७ ऑक्टोबर या दिवशी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी विराजचा विशेष सन्मान केला. विराज सर्व प्रकारच्या पेंटिंग बनवतो, मात्र त्याला सर्वाधिक कार्टून आणि डायनासोरची पेंटिंग तयार करणे आवडते, अशी माहिती त्याची आई प्रियंका यांनी दिली. विराजने कोणाकडूनही पेंटिंगचे प्रशिक्षण घेतलेले नाही.



एक वर्षाचा असताना त्याने हातात ब्रश घेतला आणि यशाचा हा प्रवास केले. आता त्याच्या कुटुंबीयांबरोबरच त्याचे शाळेतील शिक्षक देखील त्याला 'छोटा पिकासो' या नावाने ओळखतात.



## असा लागला शोध शोध अग्नीचा

अग्नीचा शोध सुमारे ४००,००० ते २० लाख वर्षांपूर्वी आदिमानवाने लावला. नैसर्गिक घटनांतून (जंगलातील वणवा/ज्वालामुखी) आगीची ओळख झाल्यानंतर, दोन गारगोटीचे दगड किंवा लाकूड घासून (friction) ठिणगी पाडण्याचे तंत्र विकसित झाले यामुळे अन्न शिजवणे, हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण आणि थंडीपासून बचाव करणे शक्य झाले सुरुवातीला आदिमानवाने जंगलातील वणवा किंवा ज्वालामुखीच्या लाव्हामुळे पेटलेल्या आगीचे निरीक्षण केले असेल गारगोटीचे दोन दगड एकमेकांवर घासल्याने किंवा ठिणगी पडून आग निर्माण होते, याचा शोध आदिमानवाला लागला दोन सुकी लाकडे एकमेकांवर घासून निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळे आग पेटवण्याची कला विकसित झाली इंग्लंडमधील 'सफोक' येथे ४,००,००० वर्षांपूर्वीचे, आयर्न पायराईट नावाचे खनिज वापरून आग पेटवल्याचे पुरावे सापडले आहेत आदिमानवाने नैसर्गिक आगीचा वापर करण्यास सुरुवात केली असावी इस्त्रायलमधील एका पुरातत्व स्थळावर आगीच्या नियंत्रित वापराचे पुरावे (जाळलेले मासे/हाडे) सापडले आहेत या काळात मानव स्वतःहून आग पेटवू लागला होता, ज्याचे पुरावे इंग्लंड आणि इतर ठिकाणी सापडले आहेत शिजवलेले अन्न खाल्ल्यामुळे मानवी मेंदूच्या विकासाला मदत झाली हिंस्र प्राण्यांना दूर ठेवण्यासाठी आगीचा वापर केला गेला रात्रीच्या वेळी अंधार दूर करण्यासाठी आणि कडाक्याच्या थंडीत उब मिळवण्यासाठी अग्नी उपयुक्त ठरला अग्नीचा शोध मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जातो




## चलती का नाम गाडी सुझुकी मोटरसायकल इंडिया तर्फे न्यू बर्गमन स्ट्रीटची सुरुवात

सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसएमआयपीएल) तर्फे आता भारतातील रस्त्यांवर ऑल न्यू बर्गमन स्ट्रीट ची सुरवात केल्याची घोषणा केली. पहिल्या पिढीतील बर्गमन स्ट्रीटची परंपरा कायम राखत सेकंड जनरेशन सुझुकी बर्गमन स्ट्रीट मध्ये डिझाईन, कार्यक्षमता आणि वैशिष्ट्यां मध्ये सुधारणा केल्या आहेत. एकूणच वाहनाची संकल्पना हळूहळू बदलत चालकाला अधिक ताजातवाना आणि प्रिमियम अनुभव हा आता लक्झरी स्कूटर क्षेत्रातील ग्राहकांना दिला जाणार आहे.२०१८ मध्ये सुरु केल्यापासून बर्गमन स्ट्रीट ने स्थीर वाढ नोंदवली असून १२५ सीसी विभागातील ही वेगाने वाढणाऱ्या मॉडेल्स पैकी एक बनली आहे.काही वर्षांपासून बर्गमन स्ट्रीट ही विविध प्रकारच्या रायडर्स चे प्रतिनिधीत्व करते. एकीकडे स्टाईलची आवड असणाऱ्या ग्राहकांसह अनोख्या आणि योग्य डिझाईन मुळे लक्ष वेधले जाते. दुसरीकडे समतोल राखणाऱ्या रायडर्स विशेष करुन आराम, वेग आणि कार्यक्षमते मध्ये समतोल साधण्यात आला आहे. यातून त्यांना एक गोष्ट एकत्र करते ती म्हणजे अभिमान- मालकी असल्याचा अनोखा अभिमान. ग्राहकांचे सक्षम मत बनवत बर्गमन स्ट्रीट चा विकास हा 'वन अ‍ॅन्ड ओन्ली' या अनोख्या प्रिमियम मॅक्सी स्टाईल्ड डिझाईन, उत्तम आराम आणि रोजच्या प्रत्यक्ष गोष्टींचे मिश्रण असल्याने स्कूटर क्षेत्रातील कोणतेच उत्पादन देऊ शकत नाही.न्यू बर्गमन स्ट्रीट हे बर्गमन स्ट्रीट- राईड कनेक्ट एडिशन आणि बर्गमन स्ट्रीट- राईड कनेक्ट एफटीएम एडिशन या दोन प्रकारात उपलब्ध होत आहे.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे









# परळीत 'ईद मिलन' कार्यक्रमातून बंधुत्वाचा संदेश

## सर्व धर्मीयांमध्ये सद्भावना वृद्धिंगत करण्याचे आवाहन; "कुराण ते संत परंपरा – सर्वत्र एकच संदेश, 'भेदभाव नाही, फक्त बंधुभाव!"

### विविधतेत एकता जपणारा परळीचा 'ईद मिलन' कार्यक्रम ठरला प्रेरणादायी "भेदभाव अमंगल" : संतविचारांची आजच्या काळाला गरज

■ **परळी (प्रतिनिधी) –**

शहरात उत्साहात पार पडलेल्या 'ईद मिलन' कार्यक्रमातून सामाजिक ऐक्य, समता आणि बंधुभावाचा प्रभावी संदेश देण्यात आला. विविध धर्मीय बांधव एकत्र येत सद्भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात वक्त्यांनी कुराण आणि पैगंबरांच्या शिकवणीचा संदर्भ देत सांगितले की, संपूर्ण मनावजात एकच माता पित्याची संतान असून सर्व एकच असून आपण सर्व भाऊ-बहिणी आहोत, हीच इस्लामची मूलभूत भूमिका आहे. त्याचप्रमाणे भारतीय संत परंपरेनेही मानवतेचा आणि समतेचा विचार रुजवला आहे. संत कबीर, संत तुकाराम, राष्ट्रसंत गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराजांनी 'भेदभाव अमंगल आहे' असे सांगत समाजाला एकात्मतेचा मार्ग दाखवला.

आधुनिक विज्ञान युगातही या संत आणि धार्मिक विचारांना पुष्टी मिळत असून, भारतीय संविधानत सुद्धा समता आणि बंदुत्वचा मूलभूत तत्वमध्या समवेश आहे मानवतेच्या एकतेचा विचार अधिक स्पष्ट होत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. शामसुंदर सोन्नर महाराज (संस्थापक अध्यक्ष, वारकरी विचार मंच महाराष्ट्र), तसेच डॉ. सय्यद रफिक पारनेरकर (महाराष्ट्र सचिव, सद्भावना मंच महाराष्ट्र), सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, प्रा. एम. एल. देशमुख (अध्यक्ष, सद्भावना मंच परळी), सय्यद इफ्तेकार अहमद (जिल्हाध्यक्ष, JIH बीड) तसेच डॉ. सय्यद जाफर खान (सचिव साहूलात पथ संस्था) , यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.


मान्यवरांनी आपल्या भाषणातून सामाजिक ऐक्य, समता आणि बंधुभाव यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सय्यद अफ्फान यांनी केले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास परळी शहरातील विविध क्षेत्रातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सूत्रसंचालन सय्यद एजाज यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सय्यद सबाहत अली यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना 'शीरखुर्मा' देऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# परळीत आज अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संघटन सृजन अभियानाचे आयोजन ; काँग्रेस नेत्या नीतू वर्मा करणार पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

## परळी वैजनाथ तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश मुंडे

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**



अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या परळी वैजनाथ येथे काँग्रेस पक्षाने संघटनात्मक बळकटीसाठी सुरू केलेले 'संगठन सृजन अभियान' ८ एप्रिल रोजी होणार आहे. तसेच परळी वैजनाथ तालुक्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची आढावा बैठक व पदाधिकारी निवड संदर्भात बैठक होणार आहे. तरी परळी वैजनाथ तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाची पक्ष बांधणी, संघटना मजबुतीकरण हा उद्देश लक्षात घेता या माध्यमातून तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व इतर निवडीचे मुख्य काम या अभियानाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस उपाध्यक्ष तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते खा. राहुल गांधी, मा. मल्लिकार्जून खर्गे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राज्याचे काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई अशोकराव पाटील , मा. अशोकराव पाटील , यांच्या मार्गदर्शनाखाली व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या संघटन सुजन अभियानच्या बीड जिल्हा प्रमुख मा.श्रीमती नितू वर्मा जी निरीक्षक अ.भा. काँग्रेस कमिटी नवी दिल्ली यांच्या सह मा.एम.एम.शेख (माजी आमदार) मा. सुरेंद्र गोडजकर (संघटन निरीक्षक) मा. श्रीमती विद्याताई पाटील (प्रदेश समन्वयक) तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कमिटी सरचिटणीस व मा. नगराध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाच्या पिंपरी चिंचवड विधानसभा प्रभारी मा. आदित्य दादा पाटील, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित केली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार "संघटन सृजन अभियान" अंतर्गत मा. तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विविध सेल अध्यक्ष, महिला काँग्रेस इ.च्या निवडीं संदर्भात या बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहेत. परळीतील दि. ०८. ०४. २०२६ रोजी चेंबरी रेस्ट हाऊस, बीड रोड येथे होणाऱ्या अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 'संघटन सृजन अभियान' हाती घेतले असून, महाराष्ट्रात हे अभियान पक्षाला तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. तसेच परळी वैजनाथ तालुक्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची आढावा बैठक व पदाधिकारी निवड संदर्भात बैठक होणार आहे. तरी परळी वैजनाथ तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# रिपब्लिकन सेनेचा पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा संकल्प!

## परळी येथील निकेश बनसोडे यांचा जाहीर पक्षप्रवेश ; रिपब्लिकन सेनेला बीडमध्ये नवी उभारी

**परळी | प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेनेच्या पक्षबांधणीला गती देण्यासाठी आयोजित जिल्हास्तरीय व्यापक संवाद बैठकीत निवडींचा अक्षरशः धडाका पाहायला मिळाला. सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीत संघटन मजबूत करण्याचा ठाम संकल्प करण्यात आला.

२९ मार्च २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह, बीड येथे युवा नेतृत्व विजय दादा साळवे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक उत्साहात पार पडली. यावेळी पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर यांची बीड लोकसभा क्षेत्र प्रमुखपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष डॉ. सुनील सूर्यवंशी आणि विजय दादा साळवे यांच्या हस्ते त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. या निवडीमुळे जिल्ह्यात पक्षाला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, परळी वैजनाथ येथील निकेश बनसोडे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश करून बैठकीचे आकर्षण वाढवले. यासोबतच अंबाजोगाई, माजलगाव, केज, धारूर, शिरूर, आष्टी, पाटोदा आणि गेवराई तालुक्यांतील शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश करत संघटनात्मक ताकद दाखवून दिली.

यावेळी नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष डॉ. सुनील सूर्यवंशी यांचा भव्य सत्कार करण्यात आला. आगामी काळात जिल्ह्यातील प्रत्येक तालुका आणि गाव पातळीवर पक्ष शाखा स्थापन करून रिपब्लिकन सेनेचे जाळे तळागाळापर्यंत पोहोचवणार असल्याचे मत विजय दादा साळवे यांनी व्यक्त केले.

बैठकीचे सूत्रसंचालन दिनकर सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. गव्हाणे सर यांनी केले. या प्रसंगी राहुल गवळी, शुद्धोधन मोरे, पंडित ओवाळ, वशिष्ठ लांडगे, विश्वनाथ तोडके, वैजनाथ गडशिंग, भूषण लोळगे,रविंद्र बनसोडे, जयप्रकाश बनसोडे,निलेश (भाऊ) बनसोडे, बापू बनसोडे,भावेश कांबळे,विनोद घुंबरे, सुशील मुंडे,बालाजी मुंडे, राजु भुतके, योगेश जगताप,कृष्णा वाघमारे राहुल सिरसट, सय्यद अन्वर, अनिल डोंगरे, भूषण काकडे, लक्ष्मण गव्हाणे, रंजीत वाघमारे, शेख युनूस, निलेश ससाने, रोहित वीर, काळू वीर, संतोष सोनकांबळे, विशाल ससाने यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**■ गोटू वीर यांच्यावर मोठी जबाबदारी-**

२९ मार्च २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह, बीड येथे रिपब्लिकन सेनेचे युवा नेतृत्व विजय दादा साळवे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष डॉ. सुनील सूर्यवंशी आणि विजय दादा साळवे यांच्या हस्ते गोटू वीर यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या निवडीमुळे बीड जिल्ह्यात रिपब्लिकन सेनेला नवसंजीवनी मिळणार असून, पक्षवाढीसाठी ही निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.



# परळी येथे माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांचा गवळी समाजाकडून भव्य व उत्स्फूर्त सत्कार

## ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिरात श्रीं चे घेतले सहकुटूंबासह घेतले दर्शन



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज आहीर हे आपल्या कुटुंबियांसह परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग भगवान वैद्यनाथ मंदिरात दर्शनासाठी आले असता, महाराष्ट्र गवळी समाज संघटनेच्या वतीने त्यांचा अत्यंत उत्साहात व भव्य स्वरूपात सत्कार करण्यात आला. या भेटीमुळे परळी शहरात तसेच गवळी समाजात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मंदिर परिसरात आगमन होताच संघटनेच्या पदाधिकार्यांनी मा. आहीर यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी घोषणाबाजी करत वातावरण भारावून टाकले होते. आहीर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या नेतृत्वाखाली समाजाला नवी दिशा मिळत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

या सत्कार प्रसंगी संघटनेचे राज्य सहसचिव जगन्नाथ साळुंके, जिल्हाध्यक्ष मुन्ना बागवाले, शहराध्यक्ष तथा नगर परिषद सदस्य नितीन बागवाले, तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व गवळी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने आहीर यांच्या कार्याचे कौतुक केले.

यानंतर मा. आहीर यांनी स्थानिक पदाधिकारी संतोष साळुंके यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी समाजातील प्रमुख पदाधिकार्यांशी सविस्तर चर्चा केली. समाजासमोरील विविध समस्या, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीचे प्रश्न, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. तसेच संघटनेच्या माध्यमातून समाज एकत्र आणून विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

आपल्या मनोगतात मा. आहीर यांनी गवळी समाज हा परंपरेने कष्टकरी व प्रामाणिक असून, योग्य मार्गदर्शन व संघटित प्रयत्नांच्या जोरावर समाज अधिक प्रगती करू शकतो, असे सांगितले. केंद्र सरकार व विविध आयोगांच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजासाठी राबविण्यात येणार्या योजनांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. समाजातील युवकांनी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा, व्यवसाय आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा स्वीकार करून स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमामुळे गवळी समाजात नवचैतन्य निर्माण झाले असून, उपस्थितांनी मा. आहीर यांच्या मार्गदर्शनामुळे समाजाच्या प्रगतीला नवी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. भविष्यातही असेच सहकार्य व मार्गदर्शन मिळावे, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले व समाज एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# भाजपा स्थापना दिनानिमित्त संवाद कार्यालयात आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण

**लातूर | प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीच्या ४७ व्या स्थापना दिनानिमित्त भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात सोमवारी सकाळी ध्वजारोहण करण्यात आले.

भाजपची स्थापना ६ एप्रिल १९८० रोजी झाली परंतु, याची पायाभरणी १९५१ मध्ये श्यामा प्रसाद मुखर्जी आणि दीनदयाल उपाध्याय यांनी स्थापन केलेल्या भारतीय जनसंघातून झाली. श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेत स्थापन झालेल्या भारतीय जनता पार्टीचा ४७ वा स्थापनादिन लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजप नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रभक्ती जनसेवा आणि हिंदुत्व या त्रिवेणी मार्गावर भाजपाचा गौरवशाली इतिहास असून देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत आणि राज्याचे धडाडीचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी संपूर्ण भाजपा परिवार अविरतपणे कार्यरत असल्याचे आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

याप्रसंगी भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर, अनिल भिसे, दीपक वांगस्कर, अमर चव्हाण, वसंत करमुडे, राज जाधव, मारुती शिंदे, बालाजी दुटाळ, बालासाहेब कदम, रमाकांत फुलारी, अजय राठोड, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, सुखदेव बर्डे, संजय डोंगरे, बाबुराव कस्तुरे, विलास पाटील यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किसान सभेच्या तालुका अध्यक्षपदी बळीराम देशमुख तर सचिवपदी भगवान बडे

**परळी / प्रतिनिधी**




शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्याने परळी तालुक्यात तमाम बीड जिल्ह्यात लढणाऱ्या अखिल भारतीय किसान सभेच्या परळी तालुका अध्यक्षपदी बळीराम देशमुख व सचिव पदी पुन्हा एकदा भगवान बडे यांची निवड करण्यात आली यावेळी 59 जणांची परळी तालुका कमिटी घोषित करण्यात आली यामध्ये पाच उपाध्यक्ष पाच सहसचिव व एक कोषाध्यक्ष असी रचना करण्यात आली एकंदर या सर्व नवनिर्वाचित तालुका कमिटीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे

तालुक्यातील सिरसाळा येथे संपन्न झालेल्या या अधिवेशनाच्या सुरुवातीला स्वागत अध्यक्ष म्हणून डॉ. श्याम पवार यांनी एकंदर शेतकऱ्यांच्या विरोधातली सर्व राजकीय परिस्थिती आणि सरकारची शेतकरी विरोधी धोरण या संदर्भामध्ये सखोल विश्लेषणात्मक मार्गदर्शन करत अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. अधिवेशनाच्या सुरुवातीला सचिव भगवान बडे यांनी मागील चार वर्षाच्या कामाचा अहवाल मांडला या अहवालावर चर्चा होऊन सर्वानुमते या अहवालाला मंजुरी देण्यात आली यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.ऑड.अजय बुरांडे, सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

# भोंदूबाबांविरुद्ध ठोस पावले : शासन, समाज आणि नागरिकांची संयुक्त जबाबदारी

भारतीय समाज श्रद्धा, परंपरा आणि अध्यात्म यांवर आधारलेला असला, तरी त्याच श्रद्धेचे अंधश्रद्धेत रूपांतर झाले की ती समाजासाठी घातक ठरते. आजच्या आधुनिक आणि विज्ञानाधारित युगातही भोंदूबाबा, ढोंगी साधू आणि खोट्या आध्यात्मिक दाव्यांचे जाळे विस्तारताना दिसते. या प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक होत असते आणि विशेषतः महिलांचे मानसिक, आर्थिक तसेच काही वेळा शारीरिक शोषण होत असल्याची उदाहरणे समोर येत आहेत. ही परिस्थिती केवळ वैयक्तिक समस्या नसून सामाजिक आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

यामुळेच एक मूलभूत प्रश्न पुढे येतो— शासनाने भोंदूबाबांविरुद्ध अधिक ठोस आणि व्यापक कारवाई का करू नये? ज्या ठिकाणी धर्माच्या नावाखाली फसवणूक, अंधश्रद्धा आणि शोषण चालते, तेथे तात्काळ कारवाई करणे ही शासनाची जबाबदारी आहे. भोंदूबाबांचे अड्डे बंद करणे ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून समाजाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक पाऊल आहे. स्थानिक पोलिस यंत्रणेकडे अशा ठिकाणांची माहिती असते; परिसरात कोण येते-जाते, कोणते प्रकार चालतात याची कल्पना त्यांना असतेच. त्यामुळे संशयास्पद हालचालींकडे दुर्लक्ष न करता, तातडीने हस्तक्षेप करून अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे.

यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांच्या संरक्षणासाठी आणि फसवणुकीविरोधात विविध कायदे उपलब्ध आहेत; तसेच अंधश्रद्धेविरोधी कायद्यांचाही उपयोग करून अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करता येते. परंतु केवळ कायदे अस्तित्वात असून उपयोग नाही; ते काटेकोरपणे राबवले गेले पाहिजेत. प्रशासनाची सक्रियता आणि जबाबदारीची जाणीव यामुळेच समाजात विश्वास निर्माण होऊ शकतो.

तथापि, ही लढाई केवळ शासनाच्या पातळीवर मर्यादित नाही. समाजाची मानसिकता बदलणे तितकेच



**डॉ. सुवर्णा कराड,**
**प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

आवश्यक आहे. लोकांनी अंधश्रद्धेला बळी न पडता विवेकाने विचार करणे गरजेचे आहे. कोणत्याही समस्येवर त्वरित आणि चमत्कारी उपाय शोधण्याची प्रवृत्तीच भोंदूबाबांना बळ देते. विशेषतः महिलांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि समाजाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे अत्यावश्यक आहे.

या संदर्भात संत गाडगे महाराज आणि संत तुकडोजी महाराज यांसारख्या संतांनी दिलेला विवेक, स्वच्छता आणि शिक्षणाचा संदेश आजही मार्गदर्शक ठरतो. त्यांनी अंधश्रद्धेविरोधात उभा केलेला विचार आजच्या काळात अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची गरज आहे. शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि माध्यमे यांच्यामार्फत वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे ही दीर्घकालीन उपाययोजना ठरू शकते.

आजच्या डिजिटल युगात नागरिकांची भूमिका आणखी महत्त्वाची ठरते. Facebook सारख्या माध्यमांवर लाखो लोक सक्रिय आहेत. आपल्या घराच्या, परिसराच्या किंवा कार्यक्षेत्राच्या आसपास काय घडते याची माहिती अनेकांना असते; परंतु ती समाजासमोर मांडण्याचे धैर्य कमी पडते. हीच बाब बदलण्याची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरातील अन्याय, भोंदूपणा किंवा संशयास्पद घटना सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर आणल्या, तर समाजात जागृती निर्माण होईल आणि प्रशासनालाही कारवाईसाठी चालना मिळेल. भीती न बाळगता सत्य मांडणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

भोंदूबाबांचे अड्डे सरकार बंद करू शकते— आणि ते करायलाच हवे. जरी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असले, तरी सकारात्मक आणि ठोस कृतीची सुरुवात शासनाने केली, तर परिवर्तनाची प्रक्रिया अधिक वेगाने घडू शकते. अशा कारवाईमुळे स्पष्ट संदेश जाईल की धर्माच्या नावाखाली फसवणूक आणि शोषण सहन केले जाणार नाही.

शेवटी, भोंदूबाबांविरुद्धची लढाई ही कायदा, शासन आणि समाज यांच्यापुरती मर्यादित नाही; ती प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. कडक शासन निर्णय, सतर्क प्रशासन, सक्रिय नागरिक आणि जागरूक समाज यांचा संगम साधला, तरच सुरक्षित, सन्माननीय आणि विवेकी समाजाची निर्मिती शक्य होईल.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, बुधवार ८ एप्रिल 2026



# सरकारच्या योजना गरजूपर्यंत पोहोचवून भाजपाचे अंत्योदयाचे स्वप्न पूर्ण करावे

## भाजपा प्रशिक्षण शिबिरात आ. रमेशआप्पा कराड यांचे अवाहन

**लातूर | प्रतिनिधी**

भाजपा कार्यकर्त्यांनी निवडणुकीपुरते काम न करता ३६५ दिवस २४ तास जनतेच्या सुखदु:खात सहभागी व्हावे, जनसामान्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केलेल्या अनेक महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ प्रत्येक घटकातील गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करून जनसंघापासून भाजपचे देशासाठी असलेले अंत्योदयाचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर येथे बोलताना केले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियाना अंतर्गत रेणापूर पिंपळफाटा येथील शामराव आकनगिरे कॉम्प्लेक्स येथे आयोजित रेणापूर शहर मंडल प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई आकनगिरे, जिपच्या महिला बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, पंसचे उपसभापती शरद दरेकर, संगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, माजी सभापती अनिल भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण वर्गात १३० भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुखांनी सहभाग घेतला.

भाजपाचा कार्यकर्ता हा पक्ष संघटनेचा कणा आहे तर प्रशिक्षित कार्यकर्ता हा भाजपाच्या विचारधारेची ताकद आहे. येत्या पाच - पंचवीस वर्षांसाठी कार्यकर्त्यांची वैचारिक फळी निर्माण करणे हा या अभियानाचा उद्देश असल्याचे सांगून यावेळी बोलताना भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, नेतृत्व जरूर करावे मात्र त्याआधी पक्षाचा विचार समजून घेऊन आचरणात आणणे गरजेचे आहे. भाजपा पक्ष जगातील सर्वात मोठा असून पक्षा पेक्षा कोणीही मोठे नाही. केंद्र आणि राज्यशासनाच्या योजनांचा समाजातील प्रत्येक वंचित गोरगरीब नागरिकाला लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून योजनेचा लाभ, योजनाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पुढाकार घ्यावा मदत करावी, असेही आवाहन त्यांनी केले.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी विविध सर्वांगीण हिताच्या योजना प्रभावीपणे राबवून रेणापूर तालुका भाजपाचा बालेकिल्ला निर्माण केला याची जाणीव ठेवून भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाची शिस्त पाळावी,



जबाबदारी लक्षात घ्यावी, अपयश का आले याचा विचार करून अपयशातून यशाकडे जाण्यासाठी पुन्हा एकदा पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करावी असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलून दाखवले.

या प्रशिक्षण शिबिरात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी, सोशल मीडिया यासह विविध विषयावर सुरज शिंदे, दिलीप पाटील, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण जाधव, नवनाथ मुरकुटे यांच्यासह इतर अनेकांनी प्रभावी मनोगत व्यक्त केले. प्रत्येक सत्रात सत्रप्रमुख म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती. प्रशिक्षण शिबिराचा समारोप मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले आणि वसंत करमूडे यांनी केला.

# पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कारासाठी पांगरीचे ज्ञानोबा मुंडे यांना जाहीर

## परळी वैजनाथ तालुक्यात पहिल्यांदाच राज्यपाल पुरस्काराचा बहुमान



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मौजे पांगरी येथील पोलीस पाटील श्री. ज्ञानोबा भगवानराव मुंडे यांची सन २०२५-२६ या वर्षासाठीच्या 'पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन व राज्यपाल यांचा हा अत्यंत मानाचा पुरस्कार असून, गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच पोलीस प्रशासनाला वेळोवेळी दिलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल त्यांना हा बहुमान जाहीर करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

या पुरस्कारासाठीची निवड प्रक्रिया दिनांक २६ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा पोलीस पाटील पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष श्री. विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असून, यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांच्यासह सर्व समिती सदस्य उपस्थित होते. सदर पुरस्कारासाठी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून विशेष पाठपुरावा करण्यात आला. पोलीस अधीक्षक नवनीत कावत व प्रभारी पोलीस उपाधीक्षक (मु.) उमाशंकर कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून तो समितीसमोर सादर करण्यात आला होता. शासनाच्या सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांमधून श्री. मुंडे यांच्या एकमेव प्रस्तावास मंजुरी देऊन त्यांची अंतिम निवड करण्यात आली आहे. उत्कृष्ट सेवेसाठी 'राज्यपाल पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल पोलीस पाटील श्री. मुंडे यांचे बीड पोलीस दलातर्फे अभिनंदन होत आहे.

या 'विशेष उल्लेखनीय सेवा राज्यपाल पुरस्काराचे' वितरण महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. हा पुरस्कार राज्यपालांच्या वतीने बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या हस्ते ज्ञानोबा मुंडे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप पालकमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र व रुपये २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) रोख रक्कम असे आहे. श्री. ज्ञानोबा मुंडे यांनी बजावलेल्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पोलीस अधीक्षक, बीड तसेच संपूर्ण बीड पोलीस दलाच्या वतीने त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# पत्रकार डॉ.जे.एन. शेख यांचे अल्पशा आजाराने दुखःद निधन

## सिरसाळ्यात व परिसरात शोक

**सिरसाळा** : सिरसाळ्यातील सुप्रसिद्ध पत्रकार डॉ. जे एन शेख यांचे अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने सिरसाळा व परिसरातील लोक शोकाकूल झाले आहेत. दिनांक ६ एप्रिल रोजी रात्री सुलतानपूर येथे उपचारा दरम्यान त्यांची प्राण ज्योत मावळली, गेल्या काही दिवसांपासून ते ह्रदयाशी संबंधित आजाराने त्रस्त होते. लातूर,संभाजीनगर या ठिकाणी दवाखान्यात उपचार केल्या नंतर त्यांच्यावर सुलतानपूर येथील दवाखान्यात उपचार सुरु होते.

परंतु उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सिरसाळ्यात व परिसरात शोक पसरला , शेख हे पत्रकाराता क्षेत्रात अनेक दिवसांपासून कार्य करत होते. दैनिक लोकमत ह्या दैनिक वृत्तपत्राचे ते सिरसाळा प्रतिनिधी



म्हणून काम पहायचे , दैनिक देवगिरी तरुण भारत, दैनिक रिपोर्ट बीड ह्या दैनिकांचे त्यांनी काम पाहिले. आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सिरसाळा व परिसरातील लोकांचे प्रश्न मांडले, पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी सामान्य जनतेचे प्रश्न सोडवून न्याय देण्याचा प्रयत्न केला. ते वैद्यकीय व्यावसायात देखील नामांकित होते. जुने बसस्थानक भागात त्यांचा दवाखाना होता. राजकिय क्षेत्रात देखील ते कार्यरत होते. सिरसाळ्याच्या पत्रकारिता, वैद्यकीय, राजकीय, सामाजिक क्षेत्रात त्यांनी कार्य केले. सर्वां सोबत आदरभावाने वागत व बोलत असत, जनमानसात त्यांची एक चांगली प्रतिमा होती. अशा अष्टपैलू डॉक्टर जे एन शेख यांच्या निधनाने सिरसाळा व परिसरात शोक पसरला आहे. त्यांच्या पश्चात तीन मुलं,पत्नी,भाऊ,नातवंड असा मोठा परिवार आहे. सिरसाळ्यातील मुस्लिम कब्रस्थानात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. घरा पासुन त्यांची अंत्ययात्रा निघाली, अंत्ययात्रेत सिरसाळा व परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रात लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षण हाच क्रांतीचा मार्ग!

# भीमजन्मोत्सव 2026 निमित्त तांबवा येथील भिमरत्न युवा प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

**तांबवा (प्रतिनिधी):**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'भीमजन्मोत्सव २०२६' चे औचित्य साधून तांबवा येथील भिमरत्न युवा प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रम आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न प्रतिष्ठानकडून केला जात आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित मार्गदर्शन सत्रात सिद्धार्थ ओव्हाळ सर यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी ज्ञान परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाची अचूक पद्धत आणि सातत्याचे महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या त्रिसूत्रीचा आधार घेत, विद्यार्थ्यांनी पूर्ण आत्मविश्वासाने आणि जिद्दीने परीक्षेत सहभागी व्हावे, असे आवाहन ओव्हाळ सर यांनी केले.

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विशेष तयारी करण्यात आली आहे. परीक्षेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. यासोबतच, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी एक वही व एक पेन भेट देण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या ठिकाणी अल्पोपहाराची (स्नॅक्स) सोयही करण्यात आली आहे.भिमरत्न युवा प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. सामाजिक बांधिलकी जपतानाच शैक्षणिक प्रसाराचे काम हाती घेतल्यामुळे परिसरातील पालकांनी आणि नागरिकांनी प्रतिष्ठानच्या कार्याला पाठिंबा दर्शवला आहे. या मार्गदर्शन सत्रास मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावून आपल्या उत्साहाचे प्रदर्शन केले.



